# Positive Story of Nagpur Rural Police

## दिनांक ०६/०६/२०२५

## अल्पवयीन पिडीतेसोबत लैंगिक अत्याचार करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पोलीस स्टेशन काटोल :—फिर्यादीच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे अप क्रमांक ८९५/२२ कलम ३५४, ३५४(अ), ३७६ (२) (जे) (एन), ३६३, ५०४, ५०६, ३२४, १०९ भादवी सह कलम ४, ८,१७ पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

हकिकत अशा प्रकारे आहे की सन २०२२ मध्ये यातील **आरोपी नामे आशिष सुरेश नारनवरे वय ३२ वर्ष ,रा. वंडली (वाघ) काटोल** याने यातील अल्पवयीन फिर्यादी / पिडीतेला ती काम करत असलेल्या दुकानातून जबरदस्तीने आपल्या दुचाकी गाडीवर बसवून त्याच्या शेतातील गोठया मध्ये नेऊन फिर्यादी सोबत तिच्या इच्छे विरूध्द जबदरदस्तीने शारीरीक संबध प्रस्थापीत केले. सदर घटनेमुळे फिर्यादी घाबरली असल्याने घटनेबाबत कोणालाही काहीही सांगितले नाही. नमुद घटनेच्या तीन महिन्यानंतर दिनांक ०४/१२/२२ रोजी चे ११/०० ते १२/०० वाजेच्या दरम्यान यातील आरोपीने फिर्यादीच्या फोनवर संपर्क करून भेटण्यास म्हटले असता फिर्यादीने नकार दिल्याने आरोपी हा फिर्यादी काम करत असलेले दुकानाजवळ गेला तेथुन फिर्यादीस जबरदस्तीने त्याच्या दुचाकीवर बसवून स्वत:च्या शेतावर घेऊन गेला व फिर्यादीस त्याच्या सोबत लग्न करण्याबाबत विचारले असता फिर्यादीने नकार दिल्याने आरोपीने फिर्यादीस लाकडी काठी ने मारहाण केली व जिवे मारण्याची धमकी दिली,अशा फिर्यादी च्या रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा नोंद.

सदर प्रकरणाचे सखोल तपास करून पोलीस उपनिरीक्षक श्रीमती पल्लवी काकडे पो. स्टे. काटोल यांनी आरोपीविरूध्द सबळ पुराव्यानिशी दोषारोप पत्र मा. न्यायालयात

दाखल केले. दिंनाक ०६/०६/२०२५ रोजी मा. जिल्हा व सत्र न्यायधीश श्री आर. पी. पांडे यांनी वरील नमुद आरोपी नामे **आशिष सुरेश नारनवरे, वय ३२ वर्ष ,रा. वंडली (वाघ) काटोल यास कलम ३७६ भादवी मध्ये १० वर्ष सश्रम कारावास व ५०००/—रू. दंड, दंड न भरल्यास ३ महिने सश्रम कारावास ,कलम ३२४ भादवी मध्ये १ वर्ष सश्रम कारावास व २०००/—रू. दंड, दंड न भरल्यास १ महिना सश्रम कारावास. ,कलम ५०६ भादवी मध्ये ६ महिने सश्रम कारावास व १०००/— रू. दंड ,दंड न भरल्यास १ महिना सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.**

सरकारचे वतीने ए.पी.पी. श्रीमती आसावरी परसोडकर यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन मपोहवा सत्यभामा मुंडे ब.कं ११३३ आणि पोहवा बाबा नेवारे, ब.नं ८२ पो.स्टे. काटोल यांनी मदत केली आहे.